

देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि उपजिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी एड्स जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला.

## तालुका अपडेट

# देगलूर महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यशाळा कार्यक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन

**देगलूर :** अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील करिअर कट्टा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने करिअर कट्टा उपक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता आर्थिक साक्षरता कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हनून जगदीश माने व उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार उपस्थित होते. करियर कट्टा समन्वयक प्रा.डॉ.माधव चोले, डॉ. सुरेश काशिदे प्रा. विनोद काळे, डॉ. संजय पाटील, डॉ. संजय देबडे प्रा. दीपक वावधने आणि डॉ. सर्जेराव रणखांब होते. प्रारंभी महाविद्यालयातील करियर कट्टा संसदेतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि करिअर कट्टा संसदेचे उद्‌घाटन करण्यात आले.

करिअर कट्टा संसदेमध्ये मुख्यमंत्री मनोज जाधव, नियोजन मंत्री -विशाल कुडकेकर, कायदे व शिस्तपालन मंत्री- श्रीदेवी वारे, सामान्य प्रशासन मंत्री -शिवानी देशमुख, माहिती व प्रसारण मंत्री - स्वाती लोखंडे, उद्योजकता विकास मंत्री- शिवकुमार मडके, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री -स्नेहल नरबागे, कौशल्य विकास मंत्री- ऋतुजा संकपाळे, संसदीय कामकाज मंत्री - ऋतुजा रणवीरकर आणि सक्रिय सदस्य जयश्री सूर्यवंशी यांचा करिअर कट्टा आणि महाविद्यालयीन प्रशासनातर्फे नेमणूका करण्यात आल्या. आपल्या मार्गदर्शनीय मांडणीमध्ये जगदीश माने यांनी आपली बुद्धी असो की पैसा योग्य ठिकाणी वापरले तरच त्याला किंमत तसेच मुल्य असते आणि या दोन्हींचाहीं प्रगतीमध्ये महत्त्वाचा वाटा असतो. त्यामुळे पैसा मुल्ये आणि त्याबरोबरच होणारी कृती योग्य दिशेने राहिली तर आपल्या जीवनात अग्रेसर राहण्याचे गणित जुळविता येते. त्यातून जीवनात ठरविलेले ध्येय गाठता येतात.

नव्या संधी, अर्थसाक्षरता, हाडवर्क आणि स्मार्ट वर्कचे महत्व, संभाव्य संकटाचा वेळीच वेध, गुंतवणूक, बचतीचे धोरण आणि सर्व पलिकडे व्यवहार कुशलता महत्त्वाची ठरते, असे त्यांनी आपल्या आजच्या करिअर कट्टाच्या व्याख्यानात आर्थिक साक्षरता याविषयावर मांडणी केली. या कार्यक्रमात ऑनलाईन पध्दतीने करिअर कट्टाचे ८७ विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील करिअर कट्टांच्या विद्यार्थ्यांनी जगदीश माने ऑनलाईन पध्दतीने आर्थिक साक्षरतेवर प्रश्न विचारून त्यांचे मते जाणून घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार तसेच महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, माहिती प्रशासन विभाग आणि करिअर कट्टाचे महाराष्ट्राचे प्रमुख शितोळे, किरण पाटील उपस्थित होते. (ता.प्र.)

Scanned with OKEN Scanner